# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


तात्काळ/कालमर्यादित

क्रमांक: 2अ/एडीएम/2013/ ८३४

दिनांक: 07 AUG 2013

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी रिक्त जागांची माहिती अपलोड करण्याबाबत.....

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येत आहे. त्यासाठी सर्व संस्थांना त्यांच्या संस्थेतील प्रथम वर्षातील अनुत्तीर्ण उमेदवारांची रिक्त जागांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपडेट करण्याबाबत कळविले आहे. सदर रिक्त जागांची माहिती आपल्या कार्यालयाकडून निश्चित करावयाची आहे. असे करत असताना आपल्या अधिनस्त ज्या संस्थांचे प्रथम वर्षाचे निकाल संबंधित विद्यापीठांनी राखीव ठेवले आहेत अशा संस्थांच्या निकालाबाबत संबंधित विद्यापीठाकडे चौकशी करून सदर संस्थेचे निकाल काही गैरप्रकारामुळे / गैरकारभारामुळे राखीव ठेवले आहेत किंवा कसे याची माहिती घेण्यात यावी. गैरप्रकार किंवा गैरकारभारामुळे निकाल राखीव ठेवण्यात आले असल्यास त्या जागा रिक्त न दर्शविता भरलेल्या असल्याचे दर्शविण्यात यावे व त्यानुसार रिक्त जागांची माहिती निश्चित करण्यात यावी.

थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्राची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया दिनांक १२.८.२०१३ पासून सुरू होत असल्यामुळे राखीव ठेवलेले निकाल मागाहून सादर होऊन संस्थेच्या मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश न होण्यासाठी सदर बाबीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(डॉ.सुभाष महाजन)

प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Budage\2013-14\DSE\letter for not declaired result.docx